Literacy for a Billion

Movie: Bhaloo
Year: 1980

Song: Narangi mosambi
Lyricist: P Sawalaram

नारंगी मोसंबी म्हणते मला
ही नारंगी मोसंबी म्हणते मला
जीवाची राणी ही भेटंल तुला रं
जीवाची सखी ही भेटंल तुला
ए नारंगी मोसंबी म्हणते मला
ही ही ही नारंगी मोसंबी म्हणते मला
जीवाची राणी ही भेटंल तुला रं
जीवाची राणी ही भेटंल तुला

मिरवीत आपुल्या रूप्याचा आईना
मिरवीत आपुल्या रूप्याचा आईना
भाळली तुझ्यावर गावरान मैना
आरं कशावरनं रं बाबा
तुझ्याकडं बघतीया चोरून बाई ना
खुदूखुदू हसतीया मारून डोळा
जीवाची राणी ही भेटंल तुला रं
जीवाची राणी ही भेटंल तुला

हातात हात राया घालून जाऊ
अहो हातात हात राया घालून जाऊ
आसूक मासूकची गाणी गाऊ
गं....
अह जावा ना सोडा

गालीचा गुलाब फुलवीत राहू
फिरूया घालून गळ्यात गळा
आरं गळ्यात गळा
जीवाची राणी बी भेटंल तुला रं
जीवाची राणी बी भेटंल तुला

मार्गिसर महिना सजणे आला
लगनाचं काय ते लवकर बोला बोला
मार्गिसर महिना सजणे आला
लगनाचं काय ते लवकर बोला
आगं पर त्याचं काय
सोडचिट्ठी दिली मी कव्हाच त्याला
बरं झालं
सोडचिट्ठी दिली मी कव्हाच त्याला
तुझ्यासाठी जीव माझा झालाय खुळा
आहा झालाय खुळा
जीवाची राणी बी भेटंल तुला रं
जीवाची राणी बी भेटंल तुला
नारंगी मोसंबी म्हणते मला
ही ही ही नारंगी मोसंबी म्हणते मला
जीवाची राणी ही भेटली मला गं
जीवाची राणी ही भेटली मला गं
जीवाची राणी भेटली मला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*